सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/ 1110
दिनांक :- 11 APR 2025

**प्रति,**
**प्राचार्य,**
सर्व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- सर्व शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थीनीसाठी तीन महिन्यांच्या स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत.**

**संदर्भ:-** १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/स्वसंरक्षण प्रशिक्षण/२०२५ दिनांक २८/०३/२०२५.
२. श्री. विजय विष्णुपंत शिंदे, माजी अध्यक्ष, शाळा मंडळ, पुणे महानगर पालिका, पुणे यांचे दिनांक १७/०३/२०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने विद्यार्थीनीच्या सुरक्षेसाठी आणि सशक्तीकरणासाठी महत्वपुर्ण पाऊल उचलत तीन महिन्याचे स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. हा उपक्रम मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यास आणि त्यांना स्वतःचे संरक्षण करण्यास सक्षम बनविण्यास मदत करेल, करीता विद्यार्थीनीच्या सुरक्षेसाठी स्वसंरक्षण, योगसाधना, मेडीटेशन, मुलभूत आरोग्य तपासणी करण्याबाबत परिपत्रक निर्गमीत करण्याबाबत श्री. विजय विष्णुपंत शिंदे, माजी अध्यक्ष, शाळा मंडळ, पुणे महानगर पालिका, पुणे यांनी संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये तंत्रशिक्षण संचालनालयास कळविलेले असून व तंत्रशिक्षण संचालनालयाने सुध्दा या कार्यालयास कळविलेले आहे. त्याची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, तांत्रिक व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या आपल्या संस्थेमध्ये विद्यार्थीनीच्या सुरक्षेसाठी स्वसंरक्षण, योगसाधना, मेडीटेशन, मुलभूत आरोग्य तपासणी करण्याबाबतचे कार्यक्रम आयोजित करुन त्यामध्ये जास्तीतजास्त विद्यार्थीनींचा सहभाग नोंदविण्यात यावा. आपल्या संस्थेत राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

**( मनोज म. अंधारे )**
**प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

**प्रत:- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०, ४४२, ४४३
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक
क्र. २/एनजीसी/स्वसंरक्षण प्रशिक्षण/२०२५

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे/ नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर
संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

विषय : सर्व शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थिनींसाठी तीन महिन्यांच्या स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत...

संदर्भ : श्री.विजय विष्णुपंत शिंदे, माजी अध्यक्ष, शाळा मंडळ, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे दि.१७.०३.२०२५ रोजीचे पत्र

संदर्भांकित पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी आणि सशक्तीकरणासाठी महत्वपूर्ण पाऊल उचलत तीन महिन्यांचे स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. हा उपक्रम मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यास आणि त्यांना स्वत:चे संरक्षण करण्यास सक्षम बनविण्यास मदत करेल. करीता विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी स्वसंरक्षण, योगसाधना, मेडीटेशन, मुलभूत आरोग्य तपासणी करण्याबाबत परिपत्रक निर्गमित करण्याबाबत श्री.विजय विष्णुपंत शिंदे, माजी अध्यक्ष, शाळा मंडळ, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे.

सबब आपल्या विभागाच्या कार्यकक्षेतील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थाकडून विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी स्वसंरक्षण, योगसाधना, मेडीटेशन, मुलभूत आरोग्य तपासणी करण्याबाबतची कार्यवाही करणेबाबत, आपल्या स्तरावरून सर्व संस्थांना सूचित करण्यात यावे.

Signed by
Vinod Mahadeorao Mohitkar
Date: 28-03-2025 12:03:41
(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

शिक्षण
09/04/25

प्रत : श्री.विजय विष्णुपंत शिंदे, माजी अध्यक्ष, शाळा मंडळ, पुणे महानगरपालिका, १२२, रविवार पेठ, शांतीनाथ सोसायटी, पुणे - ४११००२ यांना माहितीकरीता.